# उद्यान पंडीत पुरस्कार - २००९

## श्री. विलास अनंतराव ठाकूर

### मु. पो. मठ, गावडदेववाडी, ता. वेगुर्ले, जि. सिंधुदूर्ग



- कातळ जमिनीमध्ये खड्डे खोदून रायवळ आंब्याचा बाठा लावून भेट कलमे तयार करण्याचे काम.
- १९९३-९४ पासून हापूस आंबा बाग दहा वर्षासाठी करार पध्दतीने घेवून शेती .
- आंबा पिकामध्ये काजू पिकाची आंतरपीक म्हणून लागवड .
- परिसरातील शेतक-यांना आंबा , काजू व इतर दर्जेदार रोपे मिळविण्यासाठी रोपवाटिका स्थापन करुन परिसरातील शेतक-यांना कलमे /रोपे पुरवितात.
- निर्यातक्षम आंबा पॅकिंग करुन परदेशात निर्यात .
- माजी राष्ट्रपती डॉ अे.पी .जे. अब्दुल कलाम यांचे हस्त काजू पिकाचे उत्कृष्ट उत्पन्न काढण्याबद्दल फार्मर ऑफ दी इयर २००८ या पुरस्काराने सन्मानित.

# उद्यान पंडीत पुरस्कार - २००९

## श्री. सिताराम दामू पाटील

### मु. खरग, पो.वडणी, ता. चोपडा, जि. जळगांव



- एकूण १५.८५ हे. फळबाग लागवडीखालील क्षेत्र असून क्षेत्रास सिंचनासाठी ठिबक सिंचन पध्दतीचा वापर.
- शेतात ग्रँन्ड नैन जातीच्या केळीची लागवड.
- वनौषधी प्रकल्पांतर्गत केळीमध्ये आंतरपिक म्हणून सलग पध्दतीने सफेद मुसळीची लागवड.
- परिसरातील शेतकरी मेळावे घेऊन सफेद मुसळीचे उत्पादनाबाबत मार्गदर्शन.
- हळदीवर प्रक्रिया व पँकींग करुन स्वत: विक्री करतात.

# उद्यान पंडीत पुरस्कार - २००९

## श्री. गणेश गोविंद पाटील

## मु. पो. लोणखेडा, ता. शहादा, जि. नंदूरबार



- १०.०० हे. क्षेत्र असून चिकू, मोसंबी, पेरु, लिंबू, आंबा व सिताफळ या फळपिकाची लागवड .
- शेतामध्ये गांडूळखत, हिरवळीच्या खतांची पिके, जैविक खत, जिवाणू संवर्धन, जीवामृत, दशपर्णी अर्क आदींचा प्रभावीपणे वापर
- पेरुच्या बागेमध्ये किंडीचा व उंदरांचा प्रादुर्भाव होवू नये म्हणून कडूनिंबावर आधारित किडनाशकाची फवारणी.
- सेंद्रिय पध्दतीने पेरुसोबत लिंबू, चिकू, मोसंबी, आवळा, सिताफळ व मिश्र पिकांच्या फळबागाही वाढविल्या.
- फळ प्रक्रियेसाठी उत्पादक ते ग्राहक विक्री पध्दतीचा अवलंब .
- फळबागाची यशस्वी शेती केल्याने परिसरातील धुळे व नंदूरबार जिल्हयांत ते आदर्श शेतकरी म्हणून प्रचलित.

# उद्यान पंडीत पुरस्कार - २००९

## श्री. राजेंद्र हरी पाटील

### मु. पो. वाडे, ता. भडगाव, जि. जळगाव



- आधुनिक व उतीसंवर्धन तंत्रज्ञानाचा वापर करून १४ हेक्टर क्षेत्रावर केळी लागवड.
- पिक लागवडी अंतर्गत हिरवळीच्या खतासाठी ताग व मुगाच्या पिकांचा वापर
- उत्पादीत केळीचे आकर्षक पॅकिंग करून बोर्ड भावाप्रमाणे व्यापा-यांमार्फत विक्री
- करार शेतीत नवीन पायंडा रचून एकूण १५ शेतक-यांचे जीवनमान उंचावले
- कृषि विद्यापीठ उद्योगसंस्थाना भेटी देऊन नवीन तंत्र ज्ञानाची माहिती करून घेऊन स्वतः अवलंब
- परिसरातील सामाजिक उपक्रमात सहभाग

# उद्यान पंडीत पुरस्कार - २००९

## श्री. अशोक आबाजी देशमुख

### मु.पो. चिंचाळे (गडदेआखाडा), ता. राहूरी, जि. अहमदनगर



- एकूण कुटुंबाची १०.४५ हेक्टर जमीन असून त्यामध्ये प्रामुख्याने डाळींब पिकांची लागवड
- माळरानावर खडक फोडून टप्प्याटप्प्याने डाळींबाची लागवड
- पाण्याची उपलब्धता कमी असल्याने सामूहिक शेततळयांचा वापर
- सेंद्रिय खताचा वापर करण्यासाठी स्वत: गांडूळ खत शेड उभारणी, निंबोळी पेंड निर्मिती शेड उभारणी केली.
- डाळींबाचे आकर्षक पध्दतीने पॅकिंग करुन, निर्यात करून परिसरातील शेतक-यांसमोर आदर्श निर्माण केला.

# उद्यान पंडीत पुरस्कार - २००९

## श्री. शिवानंद मल्लेशी शिंगडगाव

### मु. पो. मंद्रुप, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर



- स्वत:ची ३२ हेक्टर जमीन असून त्यापैकी १८ हेक्टर क्षेत्रावर फळबाग लागवड
- शेततळयाची उंच ठिकाणी उभारणी करून त्यामध्ये मत्स्योत्पादन
- शेततळयातून सायफन पध्दतीने ३२ एकर द्राक्षांची बाग खडकाळ जमीनीवर फुलवून तेथे २५ महिला व १० पुरुष यांना कायमस्वरुपी रोजगार उपलब्ध.
- आधुनिक कृषि तंत्रज्ञानाचा अवलंब, मिनी ट्रॅक्टरद्वारे औषध फवारणी, सुधारीत कृषि औजाराचा वापर
- द्राक्षापासून बेदाणा निर्मिती करून आकर्षक आवेष्टामध्ये पॅकिंग करून विक्री
- शेतक-यांना आधुनिक पध्दतीच्या शेतीची माहिती होण्याचे दृष्टीने श्री. मळसिध्द विज्ञान मंडळ आणि गणेश फॉर्म क्लबची स्थापना.

# उद्यान पंडीत पुरस्कार - २००९

## श्री. विठ्ठल दत्तू नलवडे

### मु. पो.बेडग, ता.मिरज, जि.सांगली



- फळबाग लागवडीखाली एकूण १.९३ हेक्टर क्षेत्र असून त्यासोबतच ०.२० हेक्टर क्षेत्रावर पानमळयाची लागवड.
- फळबागेमध्ये निंबोळी व शेंगदाणा पेंडचा वापर करून सेंद्रिय पध्दतीने शेती.
- फळझाडापासून प्रतिवर्षी २.५० लाख इतके उत्पन्न.
- शेतीला पूरक म्हणून मधुमक्षिका पालन... त्यामुळे २५ ते ३० टक्के उत्पादनात वाढ.
- सेंद्रिय खताच्या उपलब्धतेसाठी २ नाडेप मॉडेल टाक्यांची उभारणी.
- शेतीशाळेत सक्रिय सहभाग घेऊन उपस्थितांना पिक संरक्षणाची माहिती व फळापासून विविध प्रक्रियायुक्त पदार्थ तयार करण्याची माहिती देतात.

# उद्यान पंडीत पुरस्कार - २००९

## श्री. राजाराम देवबा मेथे

### मु. पो. मु.पो.वाशी (मेथेमळा), ता. करवीर, जि. कोल्हापूर



- डोंगरमाथ्याची ६ हेक्टर हलकी जमीन असून त्यांनी स्वत: विहीर खोदून जमीन बागायतीखाली आणली.
- फळबाग लागवड योजनेतून फळबाग लागवड करून कडुलिंब, कढीपत्ता, सागवान, निलीगिरी , बांबू इ. झाडांची लागवड.
- टेकडीवर पाण्याचा काटकसरीने वापर.
- विविध भाजीपाला पिके घेऊन सेंद्रिय भाजीपाल्याची स्वत: उत्पादक ते ग्राहक पध्दतीने विक्री.
- शेतीस जोडधंदा म्हणून कुक्कुटपालन व दुग्धव्यवसाय
- शेतीविषयक मासिकांचा संच असून आकाशवाणी, दूरदर्शन, वर्तमानपत्रे इत्यादी माध्यमातून शेती तंत्रज्ञानाचा प्रसार.
- जिल्हा परिषदेचा कृषिनिष्ठ पुरस्कार.

# उद्यान पंडीत पुरस्कार - २००९

## श्री. दिलीप भानुदासराव चव्हाण

### मु.घारी, पो. चांगतपुरी, ता. पैठण, जि. औरंगाबाद



- एकूण २८ हेक्टर जमीन असून मोसंबी ४५०० झाडे, चिकू ३२० झाडे, आंबा केशर २४०० झाडे, आवळा ६०० झाडे, लिंबू ४०० झाडे व चिंचेच्या १०० झाडांची लागवड.
- फळाचे पॅकिंग करण्यासाठी ४० x ३० फूट आकाराचे पॅकिंग हाऊस बांधून त्यामध्ये आंबा व मोसंबी फळाची प्रतवारी करून आकर्षक पध्दतीने पॅकिंग.
- केशर आंब्याची अमेरिका, जपान, व स्वित्झर्लन्ड येथे निर्यात
- स्थानिक बाजारपेठेत आंब्याचा स्टॉल लावून स्वतः उत्पादक ते ग्राहक पध्दतीने विक्री.
- शेतीस पूरक व्यवसाय म्हणून दुग्धव्यवसाय.
- बचत गटाचे माध्यमाद्वारे इतर शेतक-यांना मार्गदर्शन.

# उद्यान पंडीत पुरस्कार - २००९

## श्री. रविंद्र भिमराव पाटील

### मु.वडगांव (जाधव), पो. सायगव्हाण, ता. कन्नड, जि. औरंगाबाद



- आंबा व चिकूच्या बागेमध्ये मिश्र पिक म्हणून मोसंबीची २२५ झाडे व रस्त्याचे दुतर्फा सागाच्या ५०० झाडांची लागवड
- जमीनीची धूप थांबविण्यासाठी नाल्याच्या कडेने बांबूची लागवड.
- फळबागेतील किड व रोगाचे नियंत्रणासाठी निंबोळी अर्क, दर्शपर्णी अर्क व व्हर्मीवॉशचा वापर.
- शेतातील उत्पादित फळ पिकावर प्रक्रिया करुन लिंबापासून सरबत, लोणचे, आंब्यापासून लोणचे, रसवाडी व केळयापासून वेफर्स हे पदार्थ तयार करून विक्री.
- शेतीला पूरक व्यवसाय म्हणून मधुमक्षिका पालन, ससेपालन, शेततळयामध्ये गोडया पाण्यातील मत्स्यसंवर्धन इ. व्यवसाय.
- परिसरातील शेतक-यांना चांगल्या प्रकारची कलमे/रोपे मिळण्यासाठी नर्सरीची स्थापना.
- कृषि मित्र सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष.
- विविध फळापासून प्रक्रिया करून खाद्यपदार्थ कसे तयार करावेत याबाबत शेतक-यांना प्रशिक्षण.

# उद्यान पंडीत पुरस्कार - २००९

## श्री. म.यासीन म.कासीम (बागवान)

### रा.बागवान कॉलनी, पूर्णा सहकारी साखर कारखाना रोड, मु.पो.ता. वसमत, जि. हिंगोली



- एकत्रित कुटुंबाची एकूण १६ हेक्टर जमीन असून शेताच्या चारही बाजूने ४००० सागवान झाडांची लागवड.
- १.६० हेक्टर क्षेत्रावर हळद व आले पिकांत आंतरपिक म्हणून झेंडूची लागवड करून विक्रमी उत्पादन.
- सर्व फळबाग व सागवानाची लागवड ठिंबक सिंचन पध्दतीवर.
- शेतीचे सेंद्रिय प्रमाणिकरण करुन घेतले असून संत्रा/मोसंबीचे स्वत: पॅकिंग करून विक्री.
- विहीर पुनर्भरण करून इतर शेतक-यांना याबाबत प्रेरित केले.
- स्वत: पुढाकार घेऊन समाजातील १५ जोडप्यांचे सामुदायिक विवाह सोहळयांचे आयोजन करून सामाजिक कार्यात सहभाग.

# उद्यान पंडीत पुरस्कार - २००९

## सौ. कल्याणी अनिल सोनोने

### मु.पो.शिंदखेड (मोरेश्वर), ता. बार्शिटाकळी, जि.अकोला



- एकूण १.२९ हेक्टर क्षेत्र असून ०.४० हेक्टर सिताफळ व ०.२४ हेक्टर क्षेत्रावर शेडनेट हाऊसची उभारणी.
- कांद्याचा बिजोत्पादन कार्यक्रम उत्कृष्टपणे राबविला.
- शेडनेटमध्ये रासायनिक खतासोबत सेंद्रिय खतांची जोड देऊन विक्रमी उत्पादन.
- बचत गटाचे माध्यमातून परिसरातील महिलांना सेंद्रिय शेती प्रोत्साहन.
- बचत गटामार्फत भेंडी उत्पादनाचा सामूहिक शेतीचा यशस्वी प्रयोग.
- पूरक व्यवसाय म्हणून दुग्धव्यवसाय तसेच जिल्हा परिषदेकडून कृषिमित्र पुरस्काराने सन्मानित.

# उद्यान पंडीत पुरस्कार - २००९

## श्री. लिलाधर पुंडलिक गाखरे

### मु.पो. सावळी (बुद्रुक), ता. कारंजा, जि.वर्धा



- एकूण १२.५८ हेक्टर शेतजमीन असून त्यामध्ये संत्रा ४.०० हे., मोसंबी १.६० हे., पपई २.०० हे., आंबा ०.२० हे. इत्यादी फळपिकांची लागवड.
- शेतातील चर व नाल्यामधून वाहणा-या पाण्याला शेततळयात अडवून विहीरीचे पुनर्भरण .
- गांडूळ खत प्रकल्प उभारुन गांडूळ खताचा नियमीत वापर.
- संत्रा पिकाची आधुनिक पध्दतीने लागवड केल्याबाबत राष्ट्रीय लिंबूवर्गीय फळ संशोधन केंद्र, नागपूरद्वारा सन्मानित.
- विविध कृषिविषयक शिबीरे, प्रदर्शने मेळावे यामध्ये सक्रिय सहभाग.
- आकाशवाणी व दूरदर्शनचे कृषि कार्यक्रमात सहभागी होऊन कृषि विस्ताराचे काम करण्याकडे कल.